Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 217 – 223

DOI: 10.5281/zenodo.10115487

Original Research Article

# महात्मा गांधी व सत्याग्रह

प्रा. डॉ. लदाफ एस. के.

इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय, औसा जि. लातूर ४१३५२० महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ladf1970@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्ताविक

1920 मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यु झाला व भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा उदय झाला. म्हणजे टिळक पर्वाचा अस्त होऊन गांधीपर्व सुरु झाले 1920 नंतरच्या संपूर्ण कालखंडावर महात्मा गांधींचा जबरदस्त प्रभाव होता. मवाळवाद, जहालवाद, क्रांतिकारी या मार्गापेक्षा सत्याग्रहाचा वेगळा मार्ग गांधींनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला दिला. महात्मा गांधींचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. बॅरिस्टरची पदवी संपादन करुन वकिलीचा व्यवसाय त्यांनी सुरु केला; परंतु त्यांचा पिंड निराळा होता. एक वकील म्हणून पारबंदरच्या व्यापा-यांसाठी ते दक्षिण आफ्रिकेत गेले व तेथेच त्यांच्या राजकीय जीवनाला प्रारंभ झाला. दक्षिण आफ्रिकेत सम्राज्यवादी व वर्णद्वेषी शक्तीविरुध्द लढताना महात्मा गांधींनी शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने भारतीयांना न्याय मिळवून दिला. त्यामुळे गांधींजीकडे सर्व जगाचे लक्ष वेधले गेले. त्यानंतर गांधी भारतात परत आले आणि चंपारण्य, खेडा, अहमदाबाद येथे त्यांनी सत्याग्रह तंत्राचा वापर करुन यश संपादन केले. बॅरिस्टर असूनही सर्वसामान्यांसारखा राहणारा व राष्ट्रीय अंदोलनाला नवी दिशा देऊ शकणारा नेता म्हणुन सर्व राष्ट्राचे लक्ष गांधींवर केंद्रीत झाले. पहिले महायुध्द संपल्यानंतर इंग्लंडला भारताच्या मदतीची गरज राहिली नाही व सकारने दडपशाही सुरु केली. रौलेट कायदा व जालियनवाला बाग हत्याकांड या दडपशाहीच्या दोन घटना पाहून गांधींनी ब्रिटिशांच्या विरुध्द सत्याग्रहाचे शिंग फुंकले, असहकार आंदोलन सुरु केले. गांधींच्या या र्निायाचे खुद्द टिळकांनीही समर्थन केले होते. या वेळी 1920 ला लोकमान्यांचा मृत्यू झाला व बदललेल्या राजकारणात राष्ट्रीय सभेची सुत्रे महात्मा गांधीकडे आली. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याला दक्षिण आर्फिकेतील त्यांच्या कार्याची पार्श्वभूमी होती.

**दक्षिण आफ्रिकेत गांधी**

दादा अब्दुल्ला नावाचा मूळचा पारबंदरचा पण नंतर ड़रबनला गेलेला एक व्यापारी दक्षिण आफ्रिकेत काम करु शकेल अशा भारतीय किलाच्या शोधात होता. नुकतेच बॅरिस्टर झालेल्या गांधींनी ही नोकरी स्वीकारली. त्यावेळी त्यांचे वय होते अवधे चोवीस. दक्षिण आर्फिकेत वकिली करताना त्यांना प्रथमश्रेणीच्या डब्यातून बाहेर काढण्यात आले. कारण, त्यांच्या गो-या सहप्रवाशाला आपल्या डब्यात कुणी काळा माणुस नको होता. या घटनेमुळे गांधींनी आत्मनिरीक्षण केलं. आपण भारतात पर जायचं की तिथेच राहून हक्कांसाठी लढा द्यायचा हा प्रश्न होता. त्यांनी तिथेच राहून वर्णभेदाच्या विरुध्द लढा देण्याचा निर्धार केला. यामुळे दक्षिण आफ्रिकेच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासालाही वेगळे वळण मिळाले.[1]

दक्षिण आर्फिकेत असताना गांधींजी एशियाटिक रजिस्ट्रेशन ॲक्ट या जुलमी अन्यायी कायद्यामुळे सत्याग्रहांच्या मार्गावर वळले. ऑगस्ट 1906 मध्ये ट्रान्सवाल सरकारने, प्रत्येक भारतीय पुरुष, स्त्री व आठ वर्षावरील मूल यांना नोंदणी सक्तीची केली. तसेच नोंदणीचा दाखला सोबत बाळगणे बंधनकारक होते. या कायद्याने रस्त्यावरुन चालणा-या माणसाकडे दाखला मागण्याचा आणि गुन्हे तपासण्यासाठी पोलिस अधिका-यांना कुणाच्याही खाजगी घरात घुसण्याचा अधिकार होता. या कायद्याच्या बाबतीत गांधी म्हणतात, जगाच्या कोणत्याही भागात स्वतंत्र माणसाविरुध्द अशा त-हेचा कायदा अस्तित्वात असल्याचे माहिती नाही. त्यात भारतीयांच्या विद्वेषाशिवाय मला काहीच दिसत नाही  हा कायदा झाला आणि भारतीयांनी तो मुकाटपणाने मान्य के तर मला वाटतं, दक्षिण आफ्रिकेतील भारतीय उद्ध्वस्त होतील. हा भारतीयांच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याचं मला स्पष्ट दिसतं. जरी अर्ज विनंत्या आणि निवेदनं असफल ठरली तरी हात जोडून स्वस्थ बसून कायद्यापुढे मान तुकविण्यापेक्षा मरण पत्करणं चांगल. या कायद्याच्या विरोधात 11 सप्टेंबर 1906 रोजी एका ज्यू व्यक्तीच्या मालकीच्या एम्पायर थिएटरमध्ये एका सभेचे आयोजन करण्यात आहे होते. शेठ शेख हबीब हे या सभेतील प्रमुख व्यक्ती होते. त्यांनी सभेतील सर्वांना अशी शपथ घ्यावयास लावली की, कुणीही या कायद्याला शरण जाणार नाही, तेव्हा या सभेला उपस्थित असलेल्या गांधींनी शपथेचं महत्त्व श्रोत्यांना पटवून दिलं. गांधी म्हणाले, देवाच्या नावाने वचन देणं किंवा शपथ घेणं हा खेळ नव्हे. अशी शपथ घेऊन ती मोडली तर देव आणि मानव यांचे आपण अपराधी ठरु. शपथेला चिकटून राहण्याच्या परिणामांबद्दल त्यांनी लोकांना सावध केलं, त्यामुळे संपत्ती जप्त होईल. तुरुंगवास भोगावा लागेल आणि हद्दपारीचीही शिक्षा होऊ शकेल. प्रत्येकांनं आपले ह्दय तपासावं जर ही शपथ निभावण्याचं सामर्थ्य आहे असं आतल्या आवाजाने सांगितलं, तरच शपथ घ्यावी आणि असं झालं तरच त्याची शपथ फलदायी ठरेल. जर वटहुकमांच कायद्यात रुपांतर झालं तर आपण त्यांचं उल्लंघन करु, अशी शपथ प्रत्येक माणासाने घेतली अन् सभेचा शेवट झाला. अशी ही चळवळी दक्षणेत उभी राहिली, जिला गांधीनी सत्याग्रह म्हटले, याचाच उपयोग भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक नवे परिमाण देण्यासाठी करण्यात आला. [2]

**सत्याग्रह : अर्थ, तंत्र व साधने**

दक्षिण आफ्रिकेत म. गांधींच्या विरोधामुळे ट्रान्सवाल सरकारला एशियाटिक रजिस्ट्रेशन ॲक्ट रद्द करावा लागला. या घटनेचे दोन महत्त्वाचे परिणाम झाले. एक म्हणजे दक्षिण आफ्रिकेत भारतीयांवर होणा-या अन्यायाच्या, अत्याचारांच्या हकिकती ऐकून  ब्रिटिशविरोधी असंतोश उफाळून आला. दुसरे म्हणजे अशा अत्याचारी सरकारला

आपल्या शांततापूर्ण सत्याग्रह व तंत्राने नमवणा-या महात्मा गांधींचे नाव सर्वतोमुखी झाले. इ.स. 1914 मध्ये म. गांधी भारतात परतले, त्यांचे राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यावरुन देशाच्या विविध भागात फिरुन परिस्थितीचे निरीक्षण केले. त्यात त्यांनी भारतीय जनतेच्या दारिद्याची, अज्ञानाची, मागासलेपणाची पूर्ण कल्पना आली. अशा जनतेचे प्रतिनिधित्व करायचे असेल, तर त्यांच्यासारखे राहायला हवे हे जाणून बॅरिस्टर गांधींनी सुटाबुटाचा त्याग केला आणि सामान्यांसारखी वेशभूषा केली व ब्रिटिशविरोधी लढ्यासाठी सत्याग्रह हे अभिनव तंत्र वापरले. या तंत्राबद्दल थोडक्यात माहिती आपण घेऊ.[3]

**सत्याग्रहाचा अर्थ**

महात्मा गांधींच्या उद्याने भारतात सत्याग्रह संग्रामाला आरंभ झाला. म. गांधी जेव्हा भारतात आले तेहा मवाळवादी नेते सर फिरोजशहा मेहता यांची भेट घेतली, त्यावेळी मेहतांनी म्हटले, हिंदुस्थान म्हणजे दक्षिण आफ्रिका नव्हे, हे लक्षात ठेवुन पुढील कार्यक्रम आखा. असा गंभीर स्वरुपाचा सल्ला गांधींना दिला. तत्पूर्वी, 1909 मध्येच राष्ट्रसभेला गांधींनी एक संदेश पाठविला होता. त्यात ते म्हणतात, हिंदुस्थानच्या सर्व आपत्तींचे निवारण करण्याचा रामबाण उपाय म्हणजे सत्याग्रह हाच होय आणि हे साधन आधुनिक भौतिक सुधारणेमुळे विनाशाकडे धावत जाणा-या मानवतेच्या उध्दारासही उपयोगी पडेल. मार्च 1998 मध्ये लोकमान्य टिळक गांधींच्या सत्याग्रहाबाबत म्हणतात, हा मार्ग सर्व प्रसंगी, सर्व काळी अवलंबविण्यासारखा असला, तरी हरएक प्रसंगी उपयोगात आणावाच की नाही अगर सर्व प्रसंगी तितकाच फलदूप होईल किंवा नाही , हे निश्चियाने सांगणे कठीण आहे. तथापि, त्या मार्गाची योग्यता मोठी आहे. हे सर्वांस कबुल करावे लागेल. सत्याग्रह शब्दास इंग्रजीत घ्ठ्ठ्ठ्ठद्वद्वत्ध्ड्ढ ड्ढद्धत्द्मद्यठ्ठदड़ड्ढ असा पर्यायी शब्द वापरला जात होता. म. गांधी आपल्या सत्याचे प्रयोग या आत्मकथेत म्हणतात पॅसिव्ह रेजिस्टन्स चा संकुचि अर्थ केला जातो, ते निर्बलांचे हत्यार आहे अशी समजूत आहे. त्यात द्वेंषाला जागा राहते आणि त्याचे अखेरचे स्वरुप हिंसेमध्येही प्रकट होऊ शकते. सत् अ आग्रह उ सदाग्रह उ सत्याग्रह, असा सत्यासाठी आग्रह हा सत्याग्रहाचा खरा अर्थ होय.[4]

ब्रिटिशांच्या सामग्राज्य शक्तीचा गांधींना पुरेपुर अंदाज होता आणि एका बलशाही अमानुष शक्तीला तेजीन करण्यासाठी त्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग शोधून काढला होता आणि यामाूनच त्यांनी लाकशक्तीचे संघटन व प्रदर्शन यथाक्रम यशस्वी करुन दाखविले. सत्याग्रह हे एक राष्ट्रीय क्रांतिशास्त्र आहे, त्याचप्रमाणे ते सर्वांगीण क्रांतीशास्त्र आणि समाज संघटना शास्त्र अगर समाजधारणा शास्त्रही आहे.

गांधींनी विकसित केलेल्या तंत्रामध्ये सत्याग्रहाला सर्वक्षेष्ठ स्थान आहे. सत्याग्र हा फक्त राजकीय विचार असून नैतिक विचार आहे आणि नैतिकता हा त्याचा पाया आहे. गांधींचे सर्व तत्त्वज्ञान नैतिकतेवरच आधारलेले आहे. सत्याग्रहावर त्यांची गाढ श्रध्दा होती. सत्याग्रहाचा पाया अहिंसा असल्यामुळे सत्याग्रहात कोणत्याही प्रकारच्या हिंसेला थारा नव्हता. सत्याग्रहात केवळ सत्याचाच आग्रह असतो. त्यामधुनच समोरच्याचे ह्दयपरिवर्तन अपेक्षित असते. स्वत: अपार कष्ट व यातना सोसून हे ह्दयपरिवर्तन गृहीत धरले आहे. सत्याग्रह हे नैतिकतेवर आधारित असे अस्त्र असून आत्मबल हा त्याचा मुख्य आधार आहे. यशापयश हे व्यक्तीच्या आत्मनिष्ठेवर अवलंबून असून ते शूर पुरुषाचे अस्त्र आहे, म्हणून त्यचा वापर वैयक्तिक पातळीवर विशेषतत्वाने केला जातो. याउलट नि:शस्त्र प्रतिकार हे राजकीय शस्त्र असून त्याचा वापर दुर्बलही सांधिकपणे करु शकतात. अन्याय, दडपशाही व शोषण या विरुध्दचा आत्म्याचा प्रतिकार म्हणजे

सत्याग्रह होय. आत्मविश्वास व आत्मक्लेश हे आत्मशक्तीचे दोन विशेष गुण होते. या दोन गुणांमुळेच विरोधकाचे ह्दयपरिवर्तन होण्यास मदत होते, विरोधकांना इजा न पोहोचता त्यांचे अज्ञान दुर होते. सत्याग्रहाचा उद्देश त्यामुळे दुहेरी ठरतो. एक ह्दयपरिवर्तन व दुसरा अज्ञान दर करणे होय. म. गांधींच्या मते, सत्याग्रह हा मानवाचा जन्मसिध्द हक्क आहे. शासन ही जनतेची प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे, तथापि, ती जर आपल्या कर्तव्यात कुचराई करत असेल तर व्यक्तीला सत्याग्रह करण्याचा अधिकार आहे. किंबहुना, ते तिचे नैतिक कर्तव्यच आहे. अर्थात, यामध्ये व्यक्तीला मृत्यूही येऊ शकतो. त्यामुळे व्यक्तीची आत्मसमर्पण करण्याची मनाची तयारी असणे अगत्याचे आहे, सत्याग्रहाच्या मार्गाने विजय निश्चितच मिळतो. त्याच्या मृत्यूने या विजयाचे पराजयात रुपांतर होत नाही. मृत्युने हौतात्म्य प्राप्त होते व त्याचे अनुकरण करुन शेकडो सत्याग्रही निर्माण होतात. अनुयायची निर्माण होणे म्हणजेच त्याची विचारप्रणाली अमर होणे. विरोधामुळेच सत्याग्रहाचे महत्त्व जगाला समजण्यास मदत होते. [5]

**सत्याग्रहीची पात्रता**

म. गांधीच्या मते कोणालाही सत्याग्रही होता येणार नाही, त्यासाठी त्यांनी सत्याग्रहीची पात्रता निश्चित केली होती. ती पुढीलप्रमाणे

1. सत्याग्रहीची परमेश्वरावर नितांत श्रध्दा आवश्यक आहे, त्यामधूनच त्याला, जरुर ते आत्मबल प्राप्त होणार आहे.
2. सत्याग्रहीस सत्तेची, प्रसिध्दीची व संपत्तीची हाव असता कामा नये.
3. सत्याग्रहीचे शारिरीक व मानसिक स्वास्थ्य उत्तम असावे.
4. सत्याग्रहीने कोणत्याही गोष्टीची भीती बाळगू नये.
5. सत्याग्रहीची आपल्या ध्येयावर अविचल निष्ठा असावी.
6. सत्याग्रह व्यक्तिगत लाभाकरिता असू नये.
7. सत्याग्रहीने काम-ग्रोधापासून दूर राहावे.
8. सत्याग्रहाच्या प्रयोगात शारिरीक बल अथवा हिंसा यांना थारा असू नये. [6]

**सत्याग्रहाची साधने**

सत्याग्रहीला सल्ल देताना गांधजींनी बजावले की, पापाचा तिरस्कार करा पाप करणा-याचा करु नका. सत्याग्रहाच्या आपल्या तंत्रामध्ये गांधींनी पुढील साधनांचा अवलंब केला होता.

१. **असहयोग**

एखाद्या कार्यात एक व्यक्ती किंवा संघटना दुस-या व्यक्ती किंवा संस्थचे सहकार्य मागत असेल तर दुस-याने ते न देणे म्हणजे असहयोग किंवा असहकार होय.

२. **सविनय कायदेभंग**

राज्यकर्ते जनतेच्या इच्छांचे प्रतिनिधित्व करीत नसतील तर लोकांनी त्यांचे कयदे पाळू नयेत. कायदेभंगापासून समाजाची हानी होत नल्यास कायदेभंग करण्यास हरकत नाही. अर्थात यामध्ये राज्यकर्त्याकडून झालेले अत्याचार सहन करण्याची क्षमता निर्माण करता आली पाहिजे आणि अशा प्रकारचे कादेभंग अहिंसेच्या मार्गानेच करण्यात आले पाहिजेत, मुख्य म्हणजे कायदेभंग हा सविनय म्हणजे नम्रतेने व्हावा.

३. **उपोषण**

सत्याग्रहासाठी उपोषणाचे माध्यम उत्तम होय. उपोषणाने समस्येकडे लक्ष केंद्रित होत. त्याचबराबर आत्मशुध्दीपण होते. मात्र उपोषण हे स्वार्थ्यासाठी असता कामा नये. ह्दयपरिवर्तनासाठी आमरण उपोषण करण्याचे मनोबल सत्याग्रहीजवळ असले पाहिजे.

४. **हरताळ**

हरताळ ही सांधिक प्रक्रिया असून ती ऐच्छिक असावी. हरताळाला बंदचे स्वरुप असू नये. आपले गा-हाणे समाजासमोर मांडण्याचे हरताळ हे प्रभावी साधन आहे. तथापि, त्याचा वारंवार प्रयोग करु नये.

५. **हिजरात**

हिजरात म्हणजे देशत्याग, अहिंसात्मक मार्गाचे प्रयत्न संपल्यानंतर अत्यंत जरुरी भासल्यास हिंसात्मक मार्गाने स्वसंरक्षण करण्याचा प्रयत्न करावा. यालाही अपयश आपल्यास देशांतर करावे.

६. **बहिष्कार**

सत्याग्रहीचे प्रभावी हत्यार म्हणजे परदेशी मालावरील बहिष्कार होय. बहिष्कारामध्ये शासकीय कार्यालये, न्यायालये, शाळा-महाविद्यालये आदींवरील बहिष्काराचाही अंतर्भाव होता.

अशा प्रकारे स्वातंत्र्यलढ्यासाठी गांधीजींनी सांगितलेला हा सत्याग्रहाचा मार्ग होय. न्याय हक्कांसाठी खंबीरपणे, परंतु अहिंसात्मक मार्गाने लढा देणे हे सत्याग्रहात अपेक्षित आहे. गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानात गौतम बुध्दाची अहिंसा व श्रीकृष्णाच्या अन्याय प्रतिकाराचा निष्काम कर्मयोग यांचा संयोग झालेला दिसून येतो. 1915 ते 20 या काळात भाषणे करुन व लेख लिहून सत्याग्रहाचे तत्वज्ञान त्यांनी सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. [7]

**सत्याग्रहाचे प्रारंभिक प्रयोग**

१. **चंपारण्य** (1917)

महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतून 191 साली भारतात आल्यानंतर आपल्या राजकीय जीवनाला प्रारंभ केला तो बिहारमधील चंपारण्य सत्याग्रहापासून 1996 मध्ये लखनौ काँग्रेसच्या वेळी बिहारमधील काही प्रतिनिधींनी म. गांधींचे लक्ष चंपारण्यातील निळीच्या मळेवाल्यांकडून तेथील शेतक-यांवर होत असलेल्या जुलूमांकडे वेधले. म्हणून 1917 मध्ये एप्रिल महिन्यात चंपारण्यातील मोतीहारी या गावी तेथील शेतक-यांची चौकशी करण्यासाठी म. गांधी तेथे पोहोचले.

चंपारण्य हा बिहारमधील एक मागासलेला व शेतीप्रधान भाग येथे युरापीय मळेवाल्यांनी निळीची लगवड सक्तीने केली होती. युध्दकाळात निळीची मागणी तात्पुरती वाढली व धान्याचीही वाहतूक अडल्यामुळे किमती घसरल्या या स्थितीत निळीच्या लागवडीखालील जमीन सोडवून घेण्याचे ठरवून मळेवाल्यांनी कुळांना त्याच्या बदली पैसे दिले. या बाबतीत कुळांवर अन्याय झाला होता.

हा अन्याय दूर करण्यासाठी गांधीजी मोतीहारीला पोहोचले तेव्हा तेथील मॅजिस्ट्रेटने, तुमच्या वास्तव्यामुळे येथील शांततेला धोका येण्याचा संभव असल्यामुळे जिल्हा सोडून जाण्याचा हुकूम कलम 144 अंतर्गत फर्माविला. गांधीजींनी तो हुकूम मोडला व मॅजिस्ट्रेटपुढे उभे करताच गुन्हाची कबुली देऊन शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे स्प्ष्ट केले. गांधींनी

तेथील परिस्थितीचे निरीक्षण करुन कुळांना न्याय देण्यासाठी सत्याग्रह सुरु केला. शेवटी सरकारने हा खटला मागे घेतला. या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमले व त्या कमिशनच्या अहवालाप्रमाणे एक कायदाही केला.

या सत्याग्रहामुळे हिंदुस्थानच्या अगदी मागासलेल्या भागातील कनिष्ठ स्तरातील लोकांशी गांधींचा संबंध आला. यामुळे शेतक-यांनी शंभर वर्षेपर्यंत कोणत्याही उपायांनी दूर झाली नव्हती, ती समस्या गांधीजींच्या सत्याग्रही व लोकसेवेच्या धोरणाने दूर झाली. हिंदी नेत्याने खालच्या थरातील लोकांचे मत घेऊन चळवळ करण्याचा हा पहिलाच प्रयोग होता यात गांधीजींनी कुळांना बराच न्याय मिळवून दिला. त्यामुळे त्यांच्याबद्दल मोठा आदर शेतक-यांत निर्माण झाला.

२. **खेडा** (1918)

गांधीजींनी दुसरा लढा दिला तो गुजरातमधील खेडा जिल्ह्यात. 1918 च्या जानेवारीत लोकांची पिके बुडाली होती, कायद्याप्रमाणे शेतकसा-यात सूट मिळणे आवश्यक होते, परंतु अधिका-यांच्या चुकीच्या वृत्तांताच्या आधारावर शेतक-यांवर सारा वसुलीचा जुलूम होत आहे, हे पाहून त्यांनी तेथे साराबंदीची चळवळ सुरु केली व लवकरच या कार्यात त्यांना यश आले. त्यामुळे म. गांधी ही आपल्यावर सत्ता जागविणा-या ब्रिटीश अधिका-यांना आपल्यापुढे नमविणारी एक शक्ती आहे, असा प्रत्यय भारतातील शेतक-यांना येऊ लागला.

३. **अहमदाबाद**

शेतक-यांप्रमाणे मजुरांच्या समस्यांकडेही गांधीजींनी लक्ष दिले. अमदाबाद हे कापड निर्मितीचे प्रमुख केंद्र . तेथील गिरणीमालक मजुरांकडून वाटेल तेवढी कामे करवुन घेत पण मिळणा-या नफ्याच प्रचंड वाटा मात्र मजुरांना देत नसत. याविरुध्द गांधींनी अहमदाबादच्या मजुरांना संप करण्याचा निर्देश दिला स्वत: गांधी उपोषणास बसले. परिणामी, गिरणीमालक वाटाघाटीस तयार झाले. चंपारण्य, खेडा, अहमदाबाद या सत्याग्रहांमुळे गांधीचे नवे तंत्र जसे यशस्वी होऊ लागले तसे त्यांना प्रसिध्दी मिळु लागली. सत्याग्रह व उपोषणाचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर, प्रसंगी राष्ट्रीय स्तरावर कण्याचा आत्मविशस गांधींमध्ये निर्माण झाला. [8]

## सारांश

अन्याविरुध शांतताने आणि दृढ निश्चित द्वारा प्रतिकार करण्याचा एक अभिनव आहिसक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे सत्याचा अग्रह धरणे प्रचीन भारतीय वागण्यात विशेषत: पौराणीक कथा आख्यायिका यातून सत्याग्रहाची काही उदाहरणे आढळतात जैसे. सत्यनिष्ठा सत्यसंघ, सत्यवृत्त या तत्त्वाचा उल्लेख आढळतो मात्र सत्याग्रह शब्दाचा अर्थ याहुन अधिक व्यापक असा आहे. सत्याग्रह यामध्ये प्रतिकारासाठी संयम व सहनशिलतेची अत्यंत आवश्यकता असते. अन्याय करणा-या व्यक्तीला सत्य व न्याय याची जाणीव करुन देणे व त्या व्यक्तीचे मत परिवर्तन करणे हे सत्याग्रहाचे उद्दीष्ट असते सत्याग्रह करणा-या व्यक्तीने हिंसा व असत्य याचा वापर करता कामानये सत्याग्रहाचा मार्ग सामान्य मानसाला ही अनुसरता येतो लोकमान्य टिळकांच्या मृत्यु नंतर राष्ट्रीय चळवळीचे सुत्र महात्मा गांधी यांच्या हाती आली आणि गांधिजीने नतृत्व स्विकारल्यानंतर भारतामध्ये प्रथमच सत्याग्रहाचा अभिनव प्रयोग करण्यात आला जुलुम व अन्याय याचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न या तंत्राच्या माध्यमातुन केला गेला आणि याच

मार्गाचा वापर करुन महात्मा गांधी यांनी संपूर्ण आयुष्यात ब्रिटिशांच्या विरोधामध्ये सत्याग्रह, असहकार, दांडीयात्रा खिलाफत चळवळ, चले जाव चळवळ अशा किती तरी मार्गाचा अवलंब करुन भारताला स्वातंत्र्य मिळवुन दिले. आज आपण पाहतो स्वतंत्र्यभारतात आज अनेक लोक आपल्या हक्कासाठी गांधीजींच्या सत्याग्रहाचा वापर करित असलेले दिसुन येते.

**संदर्भ सूची**

१. श्री. निवासताभाइ, अधुनिक भारताचा इतिहास विद्याबुक पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. 319, 320

२. भिडे गजानन, अधुनिक भारताचा इतिहास, सागर पब्लिकेशन पूणे, तृतीय आवृत्ती, पृष्ठ क्र. 265

३. देव प्रभाकर, आधुनिक भारताचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन लातूर, पृष्ठ क्र. 159

४. गांधी मो कृ, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पृष्ठ क्र. 229

५. श्री. निवासताभाइ, अधुनिक भारताचा इतिहास, विद्याबुक पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 322-323

६. कित्ता, पृष्ठ क्र. 324

७. कित्ता, पृष्ठ क्र. 324-325

८. कित्ता, पृष्ठ क्र. 325

९. पाही बी. बी., भारतीय राजकीय विचारवंत  फडके प्रकाशन, कोल्हापूर

१०. काथोळे दा यो, भारतीय सामाजिक विचारवंत कैलास, पब्लिकेशन औरंगाबाद

११. डॉ सुमन वैद्य, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर

१२. धनंजय आचार्य, भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती

१३. श द जावडेकर, नलिनी पंडित, आधुनिकभारताचा इतिहास गांधी ग्रंथालय मुंबई

१४. गांधी विचार दर्शन, धर्मविचार भाग 192 महात्मगांधी स्मारक, निधी प्रकाशन पुणे

१५. डॉ. ग.ना. जोशी, विचार विमर्श मॅजेस्टीक प्रकाशन मंुबई

१६. वैद्य सुमन, कोंडेकरशांता, आधुनिक भारताचा ईतिहास

१७. अनिल कठार, महाराष्ट्रातील समाज सुधारक, वद्या बुक पब्लिशर औरंगाबाद

१८. दत्ता सावळ, महात्मागांधी अभ्यासकेंद्र

१९. ग्रोवर बि.एल., आधुनिक भारताचा इतिहास

२०. मोरवंचीकर, आधुनिक भारताचा इतिहास

२१. Nagler. Michael M., The Nomvioleme, Hand brok A Guide For Practical Performer

२२. M. K. Gandhi, Satyagrha in South Africa, Navajivan Ahemadabad.